**वाचले :-**

१) शासन, पर्यावरण विभागाकडील निर्णय क्र.NGT-२०१८/प्र. क्र.२/तां.क्र.३, दि.१३/१२/२०१८

२) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ रायगड यांचेकडील पत्र क्र.प्राकारा/१९०७०१-FTS-०१७६,दि.०१/०७/२०१९.

३) सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड यांचेकडील पत्र क्र.जि.वि.से.प्रा.४१३/२०१९, दि.१२/०७/२०१९.

४) पोलीस अधीक्षक रायगड यांचेकडील पत्र क्र.सुशा/पर्यावरण सनियंत्रण/सदस्य/२०१९-१८२७, दि.१६/०७/२०१९.

५) या कार्यालयाची मंजूर टिपणी दि. /०८/२०१९

-------------------------------*****************----------------------------------------

जा.क्र./प्राकारा/१९०८०२FTS००४०
प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,
रायगड यांचे कार्यालय दि.०२/०८/२०१९

**आदेश :-**

ज्याअर्थी, शासन पर्यवारण विभागाकडील उपोद्घातातील अ.क्र.१ कडील निर्णयान्वये मा. हरित लवादाने राज्यातील ५३ प्रदूषित नद्याच्या पट्टयामधील प्रदूषण कमी करण्याकरीता कृती आराखडा तयार करणे, सदर आराखडयाची अंमलबजावणी करुन त्यावर सनियंत्रण करणे, याकरिता राज्यस्तवरावर मा.प्रधान सचिव (पर्यावरण) यांच्या मार्गदर्शनाखाली "नदी पुनरुस्थान समिती" गठीत केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, सदर शासन निर्णयान्वये मा.न्यायालयाच्या निर्देशानुसयार प्रदूषित नदी पट्टयां मधील प्रदूषण रोखण्यासाठी स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची (Special Environment Surveillance Task Force) ची स्थापना करण्याबाबत निर्देशीत केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त शासन निर्णयातील निर्देशांच्या अनुषंगाने समितीमधील सदस्यांच्या नियुक्तीसंदर्भात उपोद्घातील अ.क्र.३ व ४ कडील पत्रान्वये संबधित विभागाकडून नामनिर्देशन प्राप्त झालेली आहेत.

त्याअर्थी, मी डॉ.विजय सूर्यवंशी, जिल्हाधिकारी रायगड याद्वारे उपद्घातातील अ.क्र.१ कडील शासन निर्णयान्वये दिलेल्या निर्देशानुसार खालील प्रमाणे **" जिल्हास्तरीय स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची (Special Environment Surveillance Task Force) "** गठीत करण्याचे आदेश पारीत करीत आहे.

| अ.क्र. | कृती दलाचे सदस्य |
|---|---|
| १ | जिल्हा दंडाधिकारी, रायगड |
| २ | पोलीस उप अधीक्षक (गृह), रायगड (जिल्हा पोलीस अधीक्षक यांचे प्रतिनिधी) |
| ३ | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र नियंत्रण मंडळ |
| ४ | सचिव, जिल्हा सेवा प्राधिकरण, रायगड - अलिबाग<br>(विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष या नात्याने जिल्हा न्यायाधीश यांनी नियुक्त केलेला प्रतिनिधी) |

उपरोक्तप्रमाणे गठीत समितीने तसेच उपद्घातातील अ.क्र.१ कडील शासन निर्णयान्वये दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्याचे आहे.

(डॉ.विजय सूर्यवंशी)
**जिल्हाधिकारी रायगड**

Scanned by CamScanner